रयत शिक्षण संस्थेचे,

अण्णासाहेब आवटे आर्ट्स, कॉमर्स व
हुतात्मा बाबू गेनू सायन्स कॉलेज,मंचर

ता. आबेगाव जि. पुणे

वृक्षारोपण कार्यक्रम अहवाल

दिनांक २४/०८/२०२४ शनिवार रोजी अण्णासाहेब आवटे महाविद्यालयातील मराठी विभाग व महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा-मंचर, कवित्री शांता शेळके प्रतिष्ठान, मंचर व निसर्ग प्रतिष्ठान, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पावसाळ्यानिमित्त 'कृतिशील वसुंधरा काव्यसंमेलन -श्रावणशिरवा' या काव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. केवळ पर्यावरण संरक्षणावर कविता सादर करून लोकांमध्ये पर्यावरण संरक्षणाबद्दलची जनजागृती होणार नाही तर त्याबाबत ठाम अशी कृती करणे गरजेचे आहे या विचाराने या काव्य संमेलनातील कवींच्या हस्ते महाविद्यालयाच्या परिसरात विविध प्रकारच्या सुमारे 120 वृक्षांची लागवड केली.

या वृक्षारोपणास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड, महाराष्ट्र साहित्य परिषद, मंचर शाखेचे अध्यक्ष दत्ताजी पायमोडे, महाराष्ट्र साहित्य परिषद, खेड शाखेचे अध्यक्ष संतोष गाढवे, तसेच मंचर येथे काही वर्ष पी.आय. म्हणून कार्यरत असणारे मोहन जाधव,निसर्ग प्रतिष्ठान पुणे चे सचिव वैभव टेमकर तसेच महाविद्यालयाचे विभाग प्रमुख प्रो. डॉ.बी.पी. गार्डी तसेच इतर ठिकाणाहून आलेले निमंत्रित व सहभागी कवी महाविद्यालयाचे विद्यार्थीउपस्थित होते.



